अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,बारामती.

# NOTICE

Displayed on- 31/10/2023 Notice No. 397

## कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील जात संवर्गातील (कॅटेगरी) व वरिष्ठ महाविद्यालयातील राजर्षी शाहू महाराज शिक्षणशुल्क योजना (ई.बी.सी.) विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप/फ्रिशिप फॉर्म भरणेसाठी अत्यंत महत्वाची सूचना:—

शै.वर्ष २०२३—२४ एस.सी., एस.टी, एन.टी., ओ.बी.सी., व एस.बी.सी (बी.बी.ए,बी.सी.ए, बी.एसस्सी कॉम्प्युटर व एम.एसस्सी. कॉम्प्युटर फक्त एस.सी.व एस.टी.) या जातसंवर्गातील व राजर्षी शाहू महाराज शिक्षणशुल्क योजना (ई.बी.सी.) विद्यार्थ्यांचे महाडीबीटी पोर्टलवर स्कॉलरशिप/फ्रिशिपचे ऑनलाईन फॉर्म भरणेकरिता वेबसाईट सुरु झालेली आहे. तरी, विद्यार्थ्यांनी खालील वेबसाईटवर ऑनलाईन फॉर्म भरावेत. **Website www.mahadbt.maharashtra.gov.in**

ऑनलाईन फॉर्म भरणेसाठी मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे आहेत.

ऑनलाईन फॉर्म भरणेकरीता खालील कागदपत्रे आवश्यक आहेत.

१. विद्यार्थ्याचा स्वत: च्या नावाचा जातीचा दाखला.
२. सन २०२२—२३ मधील मा. तहसिलदारांचा विद्यार्थ्याच्या वडीलांचे नावे उत्पन्नाचा दाखला एस.सी, एस.टी या कॅटेगरीसाठी साठी स्कॉलरशिपकरीता उत्पन्नाची मर्यादा रु.२,५०,०००/— आहे व एन.टी, ओ.बी.सी, एस.बी.सी. या कॅटेगरीसाठी साठी स्कॉलरशिपकरीता उत्पन्नाची मर्यादा रु. १,५०,०००/— आहे. तसेच एन.टी, ओ.बी.सी, एस.बी.सी. या कॅटेगरीच्या फ्रिशिपच्या विद्यार्थ्यांसाठी व राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क योजनेच्या (ई.बी.सी.) विद्यार्थ्यांसाठी उत्पन्नाची मर्यादा रु.८,००,०००/— पर्यंत आहे.
३. वडील हयात नसतील तर आईचा उत्पन्नाचा दाखला व सोबत वडिलांच्या मृत्युच्या दाखल्याची झेरॉक्स जोडावी.
४. आधारकार्ड झेरॉक्स.
५. आधारकार्ड बॅंकखाते व मोबाईल नंबरशी संलग्न असणे आवश्यक आहे.
६. मागील वर्षीचे मार्कशिट.
७. गॅप असेल तर गॅप ॲफिडेव्हीट आवश्यक.
८. डोमासाईल सर्टिफिकेट.

९. शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्स व पी.जी. साठी टी.सी. जोडावा.

१०. स्वत: चे राष्ट्रीयकृत बॅंकेत खाते असलेले बॅंकपासबुक.
( आयएफएससी कोड व एमआयसीआर कोड नंबरचा पहिल्या पानावर शिक्का असणे आवश्यक आहे.)

११. रेशनकार्ड झेरॉक्स. (पहिले पान व कुटंबाचे नाव असलेले पान)

१२. शैक्षणिक वर्ष २०२३–२४ चे प्रवेश फी चलन झेरॉक्स.

१३. महाडीबीटीवरील ऑनलाईन प्रतिज्ञापत्र अपलोड करावे.

१४. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन फॉर्म भरताना करंट डिटेलस् या कॉलममध्ये फी पेड झिरो (शून्य) टाकणे अनिवार्य आहे.अन्यथा रक्कम टाकल्यानंतर कॉलेजने दिलेली फी सवलतीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बॅंक खात्यावर जमा होईल व विद्यार्थ्यास पुन्हा महाविद्यालयाकडे रक्कम भरावी लागेल याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी.

१५. स्कॉलरशिप फॉर्म भरताना करंट ड़िटेलस् या कॉलममध्ये विद्यार्थ्यांचा प्रवेश ग्रॅंट मध्ये असेल तर **Aided** टाकावे व नॉनग्रॅंटमध्ये प्रवेश असेल तर **UnAided** असे टाकावे. तसेच कॉलेजचे नाव बरोबर सिलेक्ट करावे.

१६. विद्यार्थ्यांना एकावेळी एकाच शिष्यवृत्ती योजनेचा फॉर्म भरावा. जर एखाद्या विद्यार्थ्याने कोणत्याही दोन योजनेचे फॉर्म भरल्यास एक योजना रिजेक्ट होते व यामध्ये कॅटेगरीतील विद्यार्थ्यांचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होते. यासाठी विद्यार्थ्यांनी शक्यतो महाडीबीटी वरील पोस्ट मॅट्रीक स्कॉलरशीपचाच फॉर्म भरावा व एकाच योजनेसाठी अर्ज करावा.

१७. विद्यार्थ्यांनी स्कॉलरशिप/फ्रिशिपचे ऑनलाईन फॉर्म भरताना खाली दिल्याप्रमाणे महाविद्यालयाचे नाव निवडावे / सिलेक्ट करावे.

**Senior College - Tuljaram Chaturchand College (0)**

**Junior College - Tuljaram Chaturchand College (27250211827)**

**Vocational (Jr.College) (MCVC) – ANEKANT EDUCATION SOCIETY'S TULJARAM CHATURCHAND COLLEGE (2765211090)**

महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन फॉर्म भरल्यानंतर विद्यार्थ्यांनी फॉर्मची प्रिंट व वरील कागदपत्रे स्वत:जवळ ठेवावीत. विद्यार्थ्यांनी हार्ड कॉपी महाविद्यालयामध्ये जमा करण्याची गरज नाही. ज्या विद्यार्थ्यांचा प्रवेश हा फी सवलतीत झालेला आहे अशा विद्यार्थ्यांनी ऑनलाईन स्कॉलरशिप/फ्रिशिपचा फॉर्म भरला नाही तर संबंधित विद्यार्थ्यांच्या होणा–या आर्थिक नुकसानीस विद्यार्थी स्वत: जबाबदार राहतील व महाविद्यालयाची उर्वरित फी भरावी लागेल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

D:\amsolankar\amsolankar\Scholarship 2020-21\Scholarship Notice 2020-21\Scholarship Notice New 2020-21.docx

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,बारामती.

# NOTICE

Notice No 606 . Displayed on- 01/02/2024

## वरिष्ठ महाविद्यालयातील बी.बी.ए, बी.बी.ए.(सी.ए.), एम.एस्सी. (संगणकशास्त्र) या शाखेमध्ये शिक्षण घेत असलेल्या एन.टी, ओ.बी.सी, एस.बी.सी. या जात संवर्गातील विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप/फ्रिशिप फॉर्म भरणेसाठी अत्यंत महत्वाची सूचना:—

महाराष्ट्र शासन इतर बहुजन कल्याण विभाग, शासन निर्णय क्रमांक : शिष्यवृत्ती — २०२३/प्र.क्र.१०१/शिक्षण —१ या शासन निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२३—२४ पासून वरिष्ठ महाविद्यालयातील एन.टी, ओ.बी.सी, एस.बी.सी, या कॅटेगरीतील बी.बी.ए (प्रथम ते तृतीय वर्ष) व बी.बी.ए. (सी.ए.)(प्रथम ते तृतीय वर्ष) तसेच एम.एस्सी.(संगणकशास्त्र) भाग १ व भाग २ या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटी पोर्टलवर स्कॉलरशिप/फ्रिशिपचे ऑनलाईन फॉर्म भरणेसाठी मान्यता देण्यात आलेली आहे. याची वरील वर्गाच्या संबधित सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

### ऑनलाईन फॉर्म भरणेकरीता खालील कागदपत्रे आवश्यक आहेत.

१. विद्यार्थ्याचा स्वत: च्या नावाचा जातीचा दाखला.

२. सन २०२२—२३ मधील तहसिलदारांचा वडीलांचेनावे उत्पन्नाचा दाखला असने आवश्यक आहे. स्कॉलरशिपसाठी उत्पन्नाची मर्यादा रु. १,५०,०००/— (एक लाख पन्नास हजार एवढी आहे.) तसेच फ्रिशिपसाठी ८,००,०००/— आठ लाख एवढी उत्पन्न मर्यादा आहे.

३. वडील हयात नसतील तर आईचा उत्पन्नाचा दाखला व सोबत वडिलांच्या मृत्युच्या दाखल्याची झेरॉक्स जोडावी.

४. आधारकार्ड झेरॉक्स जोडावी व आधारकार्ड बॅकखाते व मोबाईल नंबरशी संलग्न असणे आवश्यक आहे.

५. मागील वर्षीचे मूळ गुणपत्रकाची झेरॉक्स आपलोड करणे आवश्यक आहे. ऑनलाईन मार्कशीट अपलोड करु नये अन्यथा फॉर्म रिजेक्ट हाईल.

६. गॅप असेल तर गॅप ॲफिडेव्हीट अपलोड करणे आवश्यक आहे.

७. डोमासाईल सर्टिफिकेट अपलोड करणे आवश्यक आहे.
८. शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्स व पी.जी. साठी टी.सी. जोडावा.
९. शैक्षणिक वर्ष २०२२–२३ चे प्रवेश फी चलन अपलोड करावे.
१०. महाडीबीटीवरील ऑनलाईन प्रतिज्ञापत्र अपलोड करणे आवश्यक आहे.
११. इयत्ता १० वी व १२ वी चे मार्कशीट जोडावे.
१२. बी.बी.ए. (सी.ए) च्या विद्यार्थ्यांनी महाडीबीटीवर फॉर्म भरताना बी.सी.ए. (कॉमर्स) हा कोर्स सिलेक्ट करावा.

<u>विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती फॉर्म कसा भरावा याबाबत महत्वाची सूचना:–</u>

१. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन फॉर्म भरताना करंट डिटेलस् या कॉलममध्ये फी पेड झिरो (शून्य) टाकणे अनिवार्य आहे. अन्यथा रक्कम टाकल्यानंतर कॉलेजने दिलेली फी सवलतीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा होईल व विद्यार्थ्यास पुन्हा महाविद्यालयाकडे रक्कम भरावी लागेल याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी.
२. स्कॉलरशिप फॉर्म भरताना करंट डिटेलस् या कॉलममध्ये विद्यार्थ्यांचा प्रवेश ग्रॅंट मध्ये असेल तर **Aided** टाकावे व नॉनग्रॅंटमध्ये प्रवेश असेल तर **UnAided** असे टाकावे. तसेच कॉलेजचे नाव बरोबर सिलेक्ट करावे.
३. विद्यार्थ्यांना एकावेळी एकाच शिष्यवृत्ती योजनेचा फॉर्म भरावा. जर एखाद्या विद्यार्थ्याने कोणत्याही दोन योजनेचे फॉर्म भरल्यास एका योजनेचा फॉर्म रिजेक्ट होते व यामध्ये कॅटेगरीतील विद्यार्थ्यांचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होते. यासाठी विद्यार्थ्यांनी शक्यतो महाडीबीटी वरील पोस्ट मॅट्रीक स्कॉलरशीपचाच फॉर्म भरावा व एकाच योजनेसाठी अर्ज करावा.
४. विद्यार्थ्यांनी स्कॉलरशिप/फ्रिशिपचे ऑनलाईन फॉर्म भरताना खाली दिल्याप्रमाणे महाविद्यालयाचे नाव निवडावे/सिलेक्ट करावे.

**Senior College - Tuljaram Chaturchand College (0)**

महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन फॉर्म भरल्यानंतर विद्यार्थ्यांनी फॉर्मची प्रिंट व वरील कागदपत्रे स्वत:जवळ ठेवावीत. विद्यार्थ्यांनी हार्ड कॉपी महाविद्यालयामध्ये जमा करण्याची गरज नाही. ज्या विद्यार्थ्यांचा प्रवेश हा फी सवलतीत झालेला आहे अशा विद्यार्थ्यांनी ऑनलाईन स्कॉलरशिप/फ्रिशिपचा फॉर्म भरला नाही तर संबंधित विद्यार्थ्यांच्या होणा–या आर्थिक नुकसानीस विद्यार्थी स्वत: जबाबदार राहतील व महाविद्यालयाची उर्वरित फी भरावी लागेल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

D:\amsolankar\amsolankar\Scholarship 2020-21\Scholarship Notice 2020-21\Scholarship Notice New 2020-21.docx

Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

Notice No. 303 Displayed on : 30/09/2023

## National Means cum merit Scholarship

### कनिष्ठ महाविद्यालय शिष्यवृत्ती संदर्भात विद्यार्थ्यांना महत्वाची सूचना.

### नुतनीकरण (Renewal)

शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी कनिष्ठ महाविद्यालयात ११ वी व १२ वी मध्ये प्रवेश घेतलेला आहे. असे संबंधित विद्यार्थी मागील दोन वर्षापूर्वी अनुक्रमे इयत्ता ९ वी, व १० वी मध्ये एनएमएमएस ही शिष्यवृत्ती घेत होते. अशा विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मध्ये www.scholarships.gov.in या पोर्टलवर दि.३०/११/२०२३ पर्यंत एनएमएमएस स्कॉलरशिपचा फॉर्म आवश्यक त्या कागदपत्रांसह ऑनलाईन नुतनीकरण करावयाचे आहे. नुतनीकरण केलेनंतर फॉर्मची प्रिंट आवश्यक कागदपत्रांसह स्कॉलरशिप विभागात जमा करावी. जे विद्यार्थी सदरचा शिष्यवृत्तीचा फॉर्म रिनिवल करणार नाहीत. अशा विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप मिळणार नाही व होणा–या आर्थिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

रजिस्टार

Tuljaram Chaturchand College Baramati

प्राचार्य

D:\jadhavns\jadhavns\Scholarship 2023-2024\Scholarship Notice 2023-2024\NMS Scholarsho Notice 2023-2021 docx

Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

**Displayed on :18/10/2023** No-375 **Notice No.** 9 OCT 2023

## भारत सरकारची (सेंट्रल सेक्टर) महाविद्यालयीन व विद्यापीठ शिक्षण घेणा–या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना सन २०२३–२०२४

उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी फेब्रुवारी/मार्च २०२३ मध्ये घेतलेल्या उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य, विज्ञान, व व्यावसायिक (व्होकशनल) या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी पदवी वर्गातील प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांना नवीन अर्ज व पदवी वर्गातील व्दितीय व तृतीय वर्षासाठी व पदव्युत्तर वर्गातील प्रथम व व्दितीय वर्षातील विद्यार्थ्यांना नूतनीकरण करणेसाठी अर्ज ऑनलाईन **(Online)** पध्दतीने मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**केंद्रशासनामार्फत सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची मुदत दिनांक ३१ डिसेंबर २०२३ आहे.**

नवीन मंजूरीसाठी **(Fresh)** ज्या विद्यार्थ्यांचा उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या **Top 20th Percentile Merit List** मध्ये समावेश आहे, त्याच विद्यार्थ्यांचे नवीन मंजूरी (Fresh) शिष्यवृत्तीसाठी अर्ज ऑनलाईन (Online) भरले जातील. सदर विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या **www.dhepune.gov.in** संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्या यादीत नाव असेल अशाच विद्यार्थ्यांनी फॉर्म भरावयाचा आहे व सदर विद्यार्थ्यांनी दुस–या कोणत्याही शिष्यवृत्तीचा फॉर्म भरलेला नसावा.

किमान पात्रता व अटी :–

१. अर्जदार भारतीय नागरिक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा/स्टायपेंडचा लाभार्थी नसावा.
३. अर्जदाराच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. ४.५ लाखापेक्षा अधिक नसावे.

४. ही शिष्यवृत्ती पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आहे. मात्र कोणताही पदविका अभ्यासक्रम तसेच पत्राव्दारा व दूरस्थ शिक्षणासाठी (Diploma, Correspondence Courses & Distance Education) ही शिष्यवृत्ती योजना लागू नाही.

५. कला, वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना पाच वर्षापर्यंत शिष्यवृत्ती देय राहील.

**अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे :—नवीन मंजुरी/(Fresh)**

१. इयत्ता १२ वी ची गुणपत्रिका

२. पालकांचे राज्यशासनाने प्राधिकृत केलेल्या अधिका—याकडील वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.

**नूतनीकरणासाठी आवश्यक कागदपत्रे (Renewal)**

१. मागील वर्षाची गुणपत्रिका

- **नविन मंजूरी आणि नूतनीकरणासाठी अर्ज करण्याची कार्यपध्दती:—**

**१. सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीसाठी व नूतनीकरणासाठी** www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्द्तीने अर्ज करणे आवश्यक आहे.

२. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. ३१/१२/२०२३ ही आहे.

३. नवीन मंजुरीसाठी ज्या विद्यार्थ्यांचा उच्च माध्यमिक मंडळाच्या TOP 20 Th Percentile merit list समावेश असेल त्याच विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीसाठी अर्ज ऑनलाईन भरले जातील. सदर विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या www.dhpune.gov.in या संकेतस्थळावर लवकरात लवकर प्रसिध्द् करण्यात येईल. तसेच **HSC, CBSE** व **ICSE** या बोर्डचे TOP 20 th Percentile merit list समावेश असेल असे विद्यार्थी सुध्दा या शिष्यवृत्तीसाठी पात्र आहेत.

४. ज्या विद्यार्थ्यांकडे आधारक्रमांक आहे अशा विद्यार्थ्यांनी आधारक्रमांक या पर्यायाचा वापर करुन फॉर्म भरावा. आधारकार्ड नसेल तर त्याऐवजी अशा विद्यार्थ्यांनी आधार नोंदणी आय.डी.स्लीप किंवा बॅक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत अपलोड करुन अर्ज भरावा.

५. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे लाभ मिळणेसाठी आधार क्रमांक त्यांच्या बॅक खात्याशी संलग्न (लिंक) असणे आवश्यक आहे. ज्यामुळे लाभार्थी विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती रक्कम सुरळीतपणे जमा होण्यास मदत होईल.

६. ऑनलाईन अर्ज भरताना होम पेज वरील सर्व माहिती वाचून अर्ज भरावा व ऑनलाईन अर्ज भरुन झाल्यानंतर परिपूर्ण अर्ज आवश्यक त्या कागदपत्रासहित महाविद्यालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करावा.

७. विद्यार्थ्यांचे बॅक खाते चालू स्थितीत असने (Opererative /Active Mode ) आवश्यक आहे. जेणेकरुन शिष्यवृत्ती रकमेचे वितरण अयशस्वी (Fail ) होणार नाही.

८. विद्यार्थ्यांचे बॅक खाते स्वत:च्या नावावर असणे आवश्यक आहे. जॉईंट खाते नसावे. खाते क्रमांक व इतर बॅक तपशील भरण्यात विद्यार्थ्यांकडून चुक झाल्यामुळे शिष्यवृत्ती विलंबाने मिळाल्यास / न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित विद्यार्थ्यांची राहील.

९. ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या Home Page वरील (Standard Operating Procedure) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

१०. ऑनलाईन अर्ज भरताना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे भरुन, ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह आपल्या महाविद्यालयाकडे पुढील कार्यवाहीकरिता सादर करावी.

११. ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालयशी संपर्क साधून सदर अर्ज महाविद्यालयाच्या मदतीने पूर्ण करुन घ्यावा.

१२. एखादा पात्र विद्यार्थी नुतनीकरणासाठी अर्ज करावयाचा राहीला असेल तर पुढील वर्षी अर्ज करण्यास पात्र असेल. (परंतु ज्या वर्षाचा अर्ज करण्याचा राहीला आहे त्या वर्षाचा लाभ मिळणार नाही.

१३. एखादया पात्र विद्यार्थ्याचा नुतनीकरणासाठी अर्ज महाविद्यालय स्तरावर पडताळणी करावयाचा राहीला असेल तर सर्व अशा विद्यार्थ्यांना पुढील वर्षी योजनेसाठी अर्ज करता येईल. (परंतु ज्या वर्षाचा अर्ज करावयाचा राहीला आहे त्या वर्षाचा लाभ मिळणार नाही.)

**तरी, विद्यार्थ्यांनी नवीन व नूतनीकरण ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रिंट आवश्यक त्या कागदपत्रांसहित वरील प्रमाणे सूचनेनुसार दि. ३१/१२/२०२३ पर्यंत 'प्रशासन भवन' शिष्यवृत्ती विभागात येथे जमा करावेत. जे विद्यार्थी फॉर्म व आवश्यक कागदपत्रे याची हार्ड कॉपी जमा करणार नाही अशा विद्यार्थ्यांचे फॉर्म पुढे पाठविले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.**

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

D:\jadhavns\jadhavns\Scholarship 2023-2024\Central cector Schem 2023-20247\Central Sector Scholarship Notice 2020-21.docx

Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

Displayed on :19/12/2023 Notice No. : 500

## केंद्र शासनाची अपंग विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना शै.वर्ष २०२३–२४

केंद्र शासन अपंग विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करण्यासाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना राबविते. तरी, शै. वर्ष २०२३–२४ साठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. तरी, विद्यार्थ्यांनी दिलेल्या नियम व अटींच्या आधीन राहून खालील वेबपोर्टलवर दि. ३१/१२/२०२३ पर्यंत अर्ज करावेत.

**www. scholarships.gov.in**

नियम व अटी –

१. अर्जदार हा भारताचा रहिवासी असावा.

२. अर्जदाराची अपंगत्व टक्केवारी ४० टक्के व त्यापुढील असावी.

३. अर्जदार मागील वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण झालेला असावा.

४. **अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड लाभार्थी नसावा.**

५. अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.२.५० लाख इतकी असावी.

६. एका कुटूंबातील फक्त २ अपंग अपत्यांनांच सदर योजनेचा लाभ घेता येईल.

**अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे**

१. विद्यार्थ्याचा फोटो.

२. मागील वर्षाची गुणपत्रिकेची प्रत.

३. पालकांचे मा. तहसिलदार यांचे सन २०२२–२३ चे वार्षिक उत्पन्न प्रमाणपत्र.

४. महाविद्यालयाची चालू वर्षाची फी भरल्याची पावती /रिसीट.

५. स्वत:च्या राष्ट्रीयकृत बॅंक खाते पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत.

६. विद्यार्थ्याचे अपंग असल्याबाबतचे प्रमाणपत्र राज्य शासनाच्या सक्षम वैद्यकिय अधिका–याने

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्रमाणित केलेले असणे आवश्यक आहे.

७. आधारकार्ड छायांकित प्रत. तथापि एखाद्या विद्यार्थ्याकडे आधारकार्ड नसेल तर त्या विद्यार्थ्याने नोंदणी आयडी स्लीप किंवा बॅंक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत किंवा पॅनकार्ड अथवा ड्रायव्हिंग लायसन्सची प्रत इ. यापैकी एका कागदपत्राची छायांकित प्रत जोडावी.

८. आधार क्रमांक बॅंक खात्याशी लिंक केलेला असणे आवश्यक आहे.

**तरी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या फॉर्मची प्रिंट व आवश्यक कागदपत्रांसहित दि. ३१/१२/२०२३ पर्यंत प्रशासन भवन स्कॉलरशिप विभागात जमा करावा. याची विद्यार्थ्यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.**

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

D:\jadhavns\jadhavns\Scholarship 2023-2024\Scholarship Notice 2023-2024\Handicapped Scholarship 2023-24.docx

अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.

# Notice

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

**Notice No.** 668 **Displayed on : 23/02/2024**

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत शिष्यवृत्ती योजना (शैक्षणिक वर्ष २०२३–२४ फक्त वरिष्ठ महाविद्यालय)

## "लोकशाहीर अण्णा भाऊ साठे आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी अर्थसहाय्य योजना"

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांमार्फत विद्यार्थ्याकरिता आर्थिक दुर्बल घटकातील गुणवत्ताधारक गरजू विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य शिष्यवृत्ती योजना सुरु केलेली आहे. त्यास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मधील महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तरमध्ये शिकणारे विद्यार्थी अर्ज ऑनलाईन भरु शकतात. तरी सदर शिष्युत्तीचा ज्या विद्यार्थ्यांना लाभ घ्यावयाचा आहे त्यांनी दि. ०६/०३/२०२४ पर्यंत ऑनलाईन फॉर्म भरुन प्रिंट आवश्यक कागदपत्रांसहीत स्वत:कडे ठेवावी हार्ड कॉपीची आवश्यकता भासल्यास फॉर्म परत मागविण्यात येईल. तरी, खालील वेबसाईटवर ऑनलाईन फॉर्म भरावेत.

**http://bcud.unipune.ac.in/Scholorships/Applicant/Login.aspx**

**शिष्यवृत्तीचे नियम व अटी–**

१. विद्यार्थ्यांच्या पालकांचे (कुटुंबातील सर्व सदस्यांचे एकत्रित) शै. वर्ष २०२२–२३ मधील वार्षिक उत्पन्न रु. २,५०,०००/– पेक्षा जास्त नसावे. मा. तहसिलदारांचा उत्पन्नाचा दाखला असणे आवश्यक आहे.

२. एप्रिल/मे २०२३ मध्ये झालेल्या परीक्षेत पहिल्याच प्रयत्नांत ६५% गुण संपादित केलेले असावेत.

३. पदवी मधील विद्यार्थ्यांस सदर शिष्यवृत्ती योजनेचा फायदा तीन वर्षापैकी कोणत्याही एका वर्षात घेता येईल व पदव्युत्तर वर्गातील दोन वर्षापैकी फक्त एकाच पदव्युत्तर वर्गात विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ घेता येईल ज्या विद्यार्थ्यांनी सदर योजनेचा लाभ घेतलेला असेल अशा विद्यार्थ्यांनी पुन्हा अर्ज करु नयेत अशा विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती मंजूर होणार नाही.

४. महाविद्यालये/विद्यापीठ शैक्षणिक विभागातील अव्यवसायिक पदवी अभ्याक्रमास शिक्षण घेत असलेल्या जास्तीत जास्त २० व अव्यावसायिक पदव्युत्तर अभ्याक्रमातील जास्तीत जास्त १० विद्यार्थी सदर योजनेसाठी पात्र राहतील.

५. पात्र विद्यार्थ्यांस पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी रु. ३०००/— असे आर्थिक सहाय्य देण्यात येईल.

६. महाविद्यालय/विद्यापीठ शैक्षणिक विभागामध्ये विद्यार्थ्याने नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा. विद्यार्थ्याची नियमित अभ्यासक्रमास किमान ७५ टक्के उपस्थिती असणे आवश्यक आहे.

७. व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांची नोंदणी नसावी.

८. विद्यार्थ्यास गैरशिस्त/नैतिकता/परीक्षेतील गैरप्रकार इ.बाबत शिक्षा झालेली नसावी.

९. विद्यार्थी भारतीय नागरिक असावा. त्यासाठी नागरिकत्वाचा साक्षांकित दाखला जोडणे आवश्यक आहे.

१०. विद्यार्थ्याने बॅक खात्याची (राष्ट्रीयकृत) संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे.

११. सदरचे अर्थसहाय्य पात्र विद्यार्थ्यांस संपूर्ण अभ्यासक्रमात एकदाच दिले जाईल.

१२. शासनाकडून व विद्यापीठाकडून देण्यात येणा—या विविध शिष्यवृत्तीमध्ये विद्यार्थ्याचा आधारक्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. तसेच सदर आधारकार्ड क्रमांक आपल्या बॅक खात्याशी संलग्न असणेही आवश्यक असल्याने त्याची माहिती देण्यात यावी.

१३. शासनाच्या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळत असलेल्या विद्यार्थ्यांस सदर योजना लागू राहणार नाही. याबाबत संबधित विद्यार्थीनीने आणि प्राचार्यांनी एकत्रित हमीपत्र भरुन देणे आवश्यक राहील.

**ऑनलाईन भरलेल्या प्रिंटसोबत जोडावयाची कागदपत्रे—**

१ विद्यार्थ्याच्या पालकाचा वार्षिक उत्पन्न दाखला सन २०२२—२३ मधील मा.तहसिलदारांचा असावा.

२. मागील वर्षाची एप्रिल/मे २०२३ मार्कलिस्टची साक्षांकित झेरॉक्स प्रत.

३. नागरिकत्वाच्या दाखल्याची साक्षांकित प्रत. (डोमासाईल झेरॉक्स प्रत.)

४. आधारकार्डच्या झेरॉक्सची साक्षांकित प्रत.

५. राष्ट्रीयकृत बॅकेच्या बचत खातेच्या पासबुकची झेरॉक्स प्रत.

६. आधारकार्ड बॅक खात्याशी लिंकिग केलेले असावे.

रजिस्टार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

D:\amsolankar\amsolankar\Scholarship 2023-2024\Shinde Madam Final Report ams\Scholarship University Notice 2023-24\University Scholarship Notice 2022-23.docx

Anekant Education Society's
**Tuljaram Chaturchand College, Baramati**

# Notice

Notice No. 671 Displayed on : 23/02/2024

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत शिष्यवृत्ती योजना.
## "स्वामी विवेकानंद विद्यार्थी सहाय्य योजना (पुरग्रस्त, दुष्काळग्रस्त व आपत्तीग्रस्त भागातील विद्यार्थ्यांसाठी)"
## सन २०२३—२४ ( फ़क्त सिनीयर कॉलेज )

विद्याार्थ्यांना कोणत्या न कोणत्या कारणाने नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. अशावेळी बरेच विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहतात. विद्यार्थ्यांना आर्थिक मदत होईल या उद्देशाने शैक्षणिक वर्ष २०२३—२४ पासून नव्याने सदर योजना सुरु केलेली आहे. सदर योजनेसाठी विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. ०६/०३/२०२४ पर्यंत आहे या दिलेल्या मुदतीतच विद्यार्थ्यांनी अर्ज करावा. तसेच ऑनलाईन फॉर्मची प्रिंट आवश्यक त्या कागदपत्रांसहीत स्वत:कडे ठेवावी याची आवश्यकता भासल्यास मागविण्यात येईल.
**http://bcud.unipune.ac.in/Scholorships/Applicant/Login.aspx**

•नियम व अटी पुढीलप्रमाणे —

१. सदर योजना व्यवसायिक व अव्यवसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार लागू राहील.

२. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या चारही विद्याशाखेतील प्रत्येक आठ हजार विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार १,०००/— प्रमाणे एकूण ३२००० विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य देण्यात येईल.

३. महाविद्यालये / विद्यापीठे शैक्षणिक विभागामध्ये विद्यार्थ्यांने नियमीत अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा

४. विद्यार्थ्यांची नियमीत अभ्यासक्रमात किमान ७५ टक्के उपस्थिती असने आवश्यक आहे. यासंदर्भात प्राचार्यानी दाखला देणे आवश्यक राहील.

५. पुरग्रस्त दुष्काळग्रस्त व आपत्तीग्रस्त भागातील विद्यार्थी म्हणून मा. प्राचार्य / विद्यापीठ विभागप्रमुख यांनी शिफारस करणे आवश्यक राहील.

६. विद्यार्थ्यास या योजनेच्या कालावधीत कोणतीही पगारी नोकरी स्विकारता येणार नाही.

७. विद्यार्थ्यांस गैरशिस्त/ नैतिकता/ परीक्षेतील गैरप्रकार इ.बाबत शिक्षाझालेली नसावी.

८. विद्यार्थ्यांने त्यांच्या बॅक खात्याची संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे.
उदा. बॅकेचे नाव, पत्ता खाते क्रमांक (एम.आय.सी.आर आणि आय.
एफ.एस.सी कोड)

९. विद्यार्थ्यांचे आणि संबधित प्राचार्यांनी एकत्रित हमीपत्र भरुन देणे
आवश्यक आहे.

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

Notice No. 670 Displayed on : 23/02/2024

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत शिष्यवृत्ती योजना.
## सन २०२३–२४ (फक्त सिनीयर कॉलेज विद्यार्थ्यांसाठी)
## "महात्मा जोतीराव फुले गुणवंत विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना"

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने गुणवंत विद्यार्थ्यांनी प्रोत्साहन देण्यासाठी ही शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आलेली आहे. अव्यवसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ही योजना आहे. अटी,नियम व पात्रता असलेले परिपत्रक क्र. ३५/२०२४ नुसार विद्यापीठ वेबसाईटवर टाकलेले आहे. तरी विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य मिळण्यासाठी दि. ०६/०३/२०२४ पर्यंत ऑनलाईन फॉर्म आवश्यक कागदपत्रासहित भरावेत. तसेच ऑनलाईन फॉर्म भरुन प्रिंट आवश्यक कागदपत्रांसहीत स्वत:कडे ठेवावी आवश्यकता भासल्यास तसे कळविण्यात येईल.**

**http://bcud.unipune.ac.in/Scholorships/Applicant/Login.aspx**

- **अटी, नियम व पात्रता पुढीलप्रमाणे –**

१. विद्यार्थ्यांने मागील परिक्षेत एप्रिल/मे २०२३ मध्ये किमान ७० टक्के गुण संपादित केलेले असावेत.

२. शिष्यवृत्ती योजनेचा फायदा विद्यार्थ्यांस संपूर्ण पदवी व पदव्युत्तर काळात एकदाच दिला जात असल्याने व अगोदर शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला असेल, अशा विद्यार्थ्यांनी पुन्हा अर्ज भरु नयेत.

३. सर्व अव्यवसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार शिष्यवृत्तीसाठी विचार केला जाईल. व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांची नोंदणी नसावी.

४. पात्र विद्यार्थ्यास पदवी अभ्यासक्रमामधील कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना रु. ६०००/– व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना १०,०००/ तसेच पदव्युत्तर कला व वाणिज्य अभ्यासक्रमासाठी रु. ८०००/– व विज्ञान शाखेसाठी १६०००/– अर्थसहाय्य देण्यात येईल.

५. पात्र विद्यार्थ्यांचे वय पदवी अभ्यासक्रमाकरिता २३ व पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता २५ पेक्षा जास्त नसावे.

६. विद्यार्थ्याची नियमित अभ्यासक्रमात किमान ७५ टक्के उपस्थिती असणे आवश्यक राहील.
७. विद्यार्थ्यास गैरशिस्त/नैतिकता/परीक्षेतील गैरप्रकार इ.बाबत शिक्षा झालेली नसावी.
८. विद्यार्थी भारतीय नागरिक असावा. त्यासाठी नागरिकत्वचा साक्षांकित दाखला जोडणे आवश्यक आहे.
९. विद्यार्थ्याने बॅक खात्याची (राष्ट्रीयकृत) संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे
१०.महाविद्यालय/विद्यापीठ शैक्षणिक विभागामध्ये विद्यार्थ्यांने नियमीत अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा.
११. शासनाच्या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळत असलेल्या विद्यार्थ्यास सदर योजना लागू राहणार नाही. याबाबत संबधित विद्यार्थीनीने आणि प्राचार्यांनी एकत्रित हमीपत्र भरुन देणे आवश्यक राहील.

**ऑनलाईन भरलेल्या प्रिंटसोबत अपलोड करावयाची कागदपत्रे –**

१. विद्यार्थ्याच्या मागील वर्षाची एप्रिल/मे २०२३ मार्कलिस्टची स्वंयसाक्षांकित झेरॉक्स प्रत.
२. आधारकार्डच्या झेरॉक्सची स्वंयसाक्षांकित प्रत.
३. शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत.
४. राष्ट्रीयकृत बॅकेच्या बचत खातेच्या पासबुकची झेरॉक्स
५. बॅके खाते आधारकार्डला लिंकिग करणे आवश्यक आहे.
६. सदर योजनेसाठी उत्पन्नाच्या दाखल्याची आवश्यकता नाही.

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

Notice No. 669 Displayed on : 23/02/2024

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत शिष्यवृत्ती योजना

(शै. वर्ष २०२३–२४ वरिष्ठ महाविद्यालयातील फक्त जात संवर्गातील विद्यार्थ्यांसाठी )

## "राजर्षी छत्रपति शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना"

मागासवर्गीय घटकातील गुणवत्ताधारक गरजू विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठामार्फत सदर शिष्यवृत्ती योजना कार्यान्वित केलेली आहे. सदर योजना फक्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी लागू असून पदवी व पदव्युत्तर अव्यवसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज (सर्व संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ विभागातील एकत्रित) गुणवत्तेनुसार विचारात घेतले जातील त्यापैकी ४८ टक्के मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा एकत्रित गुणवत्तेनुसार व उर्वरित ५२ टक्के विद्यार्थ्यांचा त्या त्या प्रवर्गासाठी लागू असलेल्या आरक्षणाच्या टक्केवारीनुसार गुणानुक्रमे अर्ज विचारात घेतले जातील. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमातील योजनेस पात्र विद्यार्थ्यांना पुढील निकषानुसार शिष्यवृत्ती योजना लागू राहील. सदर योजनेसाठी ऑनलाईन फॉर्म भरणेची मुदत ०६/०३/२०२४ पर्यंत खालील वेबसाईटवर भरावेत. ऑनलाईन फॉर्म भरुन प्रिंट आवश्यक कागदपत्रांसहीत स्वत:कडे ठेवावी आवश्यकता भासल्यास सदर हार्डकॉपी परत मागविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

http://bcud.unipune.ac.in/Scholorships/Applicant/Login.aspx

- **नियम, अटी व पात्रता पुढीलप्रमाणे —**

१. सदरची योजना फक्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांनाच लागू होणार आहे.

२. सदरच्या योजनेसाठी उत्पन्नाची कोणतीही अट राहणार नाही. केवळ गुणवत्ता हा निकष राहील.

३. विद्यार्थ्याने मागील परीक्षेत एप्रिल/मे २०२३ किमान ६०% गुण मिळविलेले असावेत.

४. शिष्यवृत्ती योजनेचा फायदा विद्यार्थ्यांस संपूर्ण पदवी व पदव्युत्तर काळात एकदाच दिला जात असल्याने पदवी वर्ग व पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला असेल अशा विद्यार्थ्यांनी पुन्हा अर्ज भरु नयेत.

५. महाविद्यालय/विद्यापीठ शैक्षणिक विभागामध्ये विद्यार्थ्याने नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा.

६. विद्यार्थ्याची नियमित अभ्यासक्रमात किमान ७५ टक्के उपस्थिती असणे आवश्यक राहील

७. पात्र विद्यार्थ्यास पदवी अभ्यासक्रमासाठी कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना रु ६०००/— व विज्ञान शाखेसाठी १०,०००/— पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना रु ८०००/— व विज्ञान शाखेसाठी १६,०००/— असे आर्थिक सहाय्य देण्यात येईल.

८. सर्व अव्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचा गुणवत्तेनुसार शिष्यवृत्तीसाठी विचार केला जाईल.

९. विद्यार्थ्यास गैरशिस्त/नैतिकता/परिक्षेतील गैरप्रकार इ.बाबत शिक्षा झालेली नसावी.

१०. विद्यार्थ्याने बॅक खात्याची संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे.

११. सदरचे अर्थसहाय्य पात्र विद्यार्थ्यास संपूर्ण अभ्यासक्रमात एकदाच देण्यात येईल.

१२. पात्र विद्यार्थ्याचे वय पदवी अभ्यासक्रमाकरिता २५ व पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता ३० पेक्षा जास्त नसावे.

१३. शासनाकडून व विद्यापीठाकडून देण्यात येणा—या विविध शिष्यवृत्तीमध्ये विद्यार्थ्यांचा आधारक्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. तसेच सदर आधारकार्ड क्रमांक आपल्या बॅक खात्याशी संलग्न असणेही आवश्यक असल्याने त्याची माहिती बॅकेस देण्यात यावी.

१४. सदर शिष्यवृत्ती योजनेचा लाभ विहीत केलेल्या विद्यार्थी संख्येनुसार देण्यात येणार असून त्यापैकी ४८ टक्के विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार (मागास वर्ग विद्यार्थ्यांची एकत्रित गुणवत्ता विचारात घेऊन) व उर्वरित ५२ टक्के गुणवत्ताधारक मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्या त्या प्रवर्गासाठी शासनाने विहित केलेल्या आरक्षणाच्या टक्केवारनुसार शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाईन.

१५. शासनाच्या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळत असलेल्या विद्यार्थ्यास सदर योजना लागू राहणार नाही. याबाबत संबधित विद्यार्थीनीने आणि प्राचार्यांनी एकत्रित हमीपत्र भरुन देणे आवश्यक राहील.

**अर्जासोबत ऑनलाईन अपलोड करावयाची कागदपत्रे**

१. विद्यार्थ्याच्या मागील वर्षाची एप्रिल/मे— २०२३ मधील मार्कलिस्टची स्वंयसाक्षांकित झेरॉक्स प्रत.

२. आधारकार्डच्या झेरॉक्सची स्वंयसाक्षांकित प्रत.

३. जातीच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत.

४. शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत.

५. राष्ट्रीयकृत बॅकेच्या बचत खातेच्या पासबुकची झेरॉक्स

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

D:\amsolankar\amsolankar\Scholarship 2023-2024\Shinde Madam Final Report ams\Scholarship University Notice 2023-24\University Scholarship Notice 2022-23.docx

अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.

# Notice

Notice No. 465 667 Displayed on : 23/02/2024

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत शिष्यवृत्ती योजना (फक्त वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी) 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अर्थसहाय्य योजना'

## शिष्यवृत्ती सन २०२३-२०२४

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत विद्यार्थिनीकरिता क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना सुरु केलेली आहे. त्यास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२३—२४ साठी आपल्या महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तरमध्ये शिकणा—या विद्यार्थिनी अर्ज ऑनलाईन भरावयाचे आहेत. तरी सदर शिष्यवृत्ती ज्या विद्यार्थिनींना लाभ घ्यावयाचा आहे. त्यांनी दि. ०६/०३/२०२४ पर्यंत ऑनलाईन फॉर्म भरुन प्रिंट आवश्यक कागदपत्रांसहीत स्वत:कडे ठेवावी आवश्यकता भासल्यास परत फॉर्म मागविण्यात येईल. सदरचे फॉर्म खालील वेबसाईटवर ऑनलाईन भरावेत.

http://bcud.unipune.ac.in/Scholorships/Applicant/Login.aspx

### शिष्यवृत्तीचे नियम व अटी—

१. विद्यार्थिनी एप्रिल/मे २०२३ मध्ये झालेल्या परीक्षेत पहिल्याच प्रयत्नांत ५०% पेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झालेली असावी.

२. शिष्यवृत्ती योजनेचा फायदा विद्यार्थिनीस संपूर्ण पदवीच्या तीन वर्षात एकदाच दिला जात असल्याने या शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेल्या विद्यार्थिनीने पुन्हा अर्ज करु नये. तसेच पदव्युत्तर वर्गातील ज्या विद्यार्थ्यांनीने सदर शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला असेल, अशा विद्यार्थिनीने पुन्हा अर्ज करु नये.

३. महाविद्यालये/विद्यापीठ शैक्षणिक विभागातील अव्यवसायिक पदवी अभ्याक्रमास शिक्षण घेत असलेल्या जास्तीत जास्त १० व अव्यवसायिक पदव्युत्तर अभ्याक्रमातील जास्तीत जास्त ०५ विद्यार्थिनी सदर योजनेसाठी पात्र राहतील.

४. विद्यार्थिनींच्या पालकांचे उत्पन्न सन २०२२—२३ मध्ये रु. २,५०,०००/— पेक्षा च्या जास्त नसावे. यासाठी मा. तहसिलदार यांचा दाखला आवश्यक राहील.

. विद्यार्थिनींनी व्यवसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेला नसावा.

६. अर्थसहाय्यासाठी विद्यार्थिनींच्या शैक्षणिक प्रगतीबरोबर इतर उपक्रमातील सहभाग. उदा. क्रीडा, समाजसेवा, कला इ. विचारात घेण्यात येईल.

७. सदर शिष्यवृत्तीची रक्कम रु. ५०००/— इतकी आहे.

८. विद्यार्थिनीस गैरशिस्त/नैतिकता/परिक्षेत गैरप्रकार इ.बाबत शिक्षा झालेली नसावी.

९. विद्यार्थिनीस या योजनेच्या कालावधीत कोणतीही पगारी नोकरी अथवा शिष्यवृत्ती स्विकारता येणार नाही.

१० सदरचे अर्थसहाय्य पात्र विद्यार्थिनीस संपूर्ण पदवी व पदव्युत्तर काळात एकदाच देण्यात येईल.

११. विद्यार्थिनीने तिच्या बॅक खात्याची (राष्ट्रीयकृत) संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे.

१२. विद्यार्थिनींची नियीमत अभ्यासक्रमास किमान ७५% उपस्थिती असणे आवश्यक आहे.

१३.शासनाकडून व विद्यापीठाकडून देण्यात येणा—या विविध शिष्यवृत्तीमध्ये विद्यार्थ्यांचा आधारक्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. तसेच सदर आधारकार्ड क्रमांक आपल्या बॅक खात्याशी संलग्न असणेही आवश्यक असल्याने त्याची माहिती बॅकेस देण्यात यावी.

१४. शासनाच्या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळत असलेल्या विद्यार्थीनिस सदर योजना लागू राहणार नाही. याबाबत संबधित विद्यार्थीनीने आणि प्राचार्यांनी एकत्रित हमीपत्र भरुन देणे आवश्यक राहील.

<u>ऑनलाईन फॉर्म सोबत जोडावयाची कागदपत्रे —</u>

१. एप्रिल/मे — २०२३ ची गुणपत्रिकेची साक्षांकित झेरॉक्स प्रत.
२. शैक्षणिक वर्ष २०२२—२३ मधील मा. तहसिलदार यांनी दिलेला उत्पनाचा दाखला.
३. रहिवाशी दाखला/आधारकार्डाची झेरॉक्स साक्षांकित झेरॉक्स प्रत.
४. बॅक पासबुकची झेरॉक्स प्रत
५. बॅक खाते आधारकार्ड आधार लिंकिग केलेले असावे.

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

D:\amsolankar\amsolankar\Scholarship 2023-2024\Shinde Madam Final Report ams\Scholarship University Notice 2023-24\University Scholarship Notice 2022-23.docx

Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

Notice No. 87 Displayed on : 18/06//2024

## कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील जात संवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज भरणेसाठी मुदतवाढीसंदर्भात अत्यंत महत्वाची सूचना.

शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मधील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील शिष्यवृत्ती फॉर्म भरणेसंदर्भात एस.सी,एस.टी, एन.टी, ओ.बी.सी, एस.बी.सी, व राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क योजना (एस.ई.बी.सी फक्त वरिष्ठ महाविद्यालय) व अन्य शिष्यवृत्तीच्या ज्या योजना आहेत अशा सर्व योजनांची शिष्यवृत्ती फॉर्म भरणेची मुदत दि. ३०/०६/२०२४ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. तरी, अद्याप पर्यंत ज्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचे फॉर्म भरलेले नाहीत अशा सर्व विद्यार्थ्यांनी **mahadbt.maharashtra.gov.in** या वेबसाईटवर दि. ३०/०६/२०२४ पर्यंत आपले शिष्यवृत्तीचे फॉर्म भरावेत.

तरी, शिष्यवृत्तीचे फॉर्म न भरलेल्या उर्वरित विद्यार्थ्यांनी याची गांभीर्याने नोंद घ्यावी व दिलेल्या मुदतीत शिष्यवृत्तीचे ऑनलाईन फॉर्म भरावेत. शिष्यवृत्तीच्या फॉर्मला कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत याबाबतची स्वतंत्र नोटीस महाविद्यालयाच्या ऑफलाईन नोटीस बोर्डवर व www.tccollege.org या वेबसाईटवर पहावी. जे विद्यार्थी या मुदतीत शिष्यवृत्तीचे अर्ज भरणार नाहीत व ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश फी सवलतीत झालेले आहेत. अशा सर्व विद्यार्थ्यांना उर्वरित फी भरावी लागेल. तसेच यापुढे मुदत वाढणार नाही याची संबधित सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

रजिस्ट्रार

प्राचार्य

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

D:\amsolankar\amsolankar\Scholarship 18-19\Notice\Scholarship Notice New 2018-19 N... 2022.docx